# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,
# ठाणे उपविभाग, ठाणे यांचे कार्यालय.


क्र.महसूल/टे-२/जमिनबाब/मिरा भाईंदर/कांदळवन-६ प्रसिध्दी/कावि-१०/२०२२. दिनांक-११/१०/२०२२

## भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ६ अन्वये करावयाची उद्‌घोषणा.

मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ अन्वये ठाणे जिल्हयातील ठाणे तालुक्यातील व मिरा भाईंदर महानगरपालिका कार्य क्षेत्रातील खालील अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली जमीन राखीव वन म्हणून स्थापित करण्याबावत एफएलडी-१२/२०२०/प्र.क्र.२८७/फ-३, दि.१२ जानेवारी, २०२१ या क्रमांकाची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, जानेवारी १२, २०२१/पौष २२, शके १९४२ मध्ये प्रसिध्द करणेत आली आहे. उपरोक्त अधिसुचनेतील जमिनीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

### अनुसूची

जिल्हा - ठाणे, तालुका – ठाणे, महानगरपालिका- मिरा भाईंदर.

| अ.क्र. | गावाचे नाव | सर्वे नंबर | क्षेत्र (हे.आर.) | चर्तु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | वरसावे | २९ | ०.६८१५ | ३० | २८ | खाडी | ३२ |
| | | ३० | ०.९४१० | ३१ | २९ | खाडी | ३१, ३२ |
| २ | घोडबंदर | २२७ | ०.३५४० | खाडी | ६१ | ६० | ६२ |
| | | २२८/२ | ०.०९४० | ४९,५० | ५१,५२,५३, ५४,२३० | २२९ | ५५,२३२ |
| | | २४२ | २.५३०० | खाडी | नवघर | खाडी | ५०,२२९ |
| ३ | पेणकरपाडा | १/१अ | १.४५०० | महाजनवाडी | खाडी | ४, ७९ | दहिसर |
| | | ७ | ३.६५७० | ७७ | ८ | ९ | खाडी |
| | | २३ | ०.०५०० | २४ | खाडी | खाडी | २४ |
| | | २४ | २३.५९५० | २२ | खाडी | खाडी | २२ |
| | | २१ | २३.३६०० | खाडी | खाडी | खाडी | खाडी |
| | | २२ | ५.४९०० | खाडी | खाडी | २४ | खाडी |
| ४ | नवघर | १५ | २५.२००० | खाडी | खाडी | खाडी | खारी गाव १३, १४, १६, ३८, ७२, ७३, ७४ |
| | | २०/२ | १.२५०० | १७, १८, १९ | २१, २३, २४ | ११९ व गावठाण | १६, ३८ |
| | | २४/२ | ०.३००० | ३८ | २३ | २० | २५ |
| | | ७३/२ | ०.९३५० | ७४ | ७२ | खाडी | ७४ |
| | | ७४/१ब | ०.६२०० | घोडबंदरची शिव | ७३, ७५, ७८ | खाडी | घोडबंदरची शिव |


कार्यालयाचा पत्ता : २१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कोर्टनाका, ठाणे (प)-४००६०१
दूरध्वनी क्र : ०२२-२५३४५११० ★ ईमेल : sdothane@gmail.com

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | उत्तण | ३०३ | ३.०२२० | ३५३ | ३५२ | ३५३ | ३०४ |
| | | ३०४ | ३.४७५० | ३५३ | ३५२ | ३०३ | ३०५ |
| | | ३०५ | ३.६१४० | ३५३ | ३५२ | ३०४ | ३०६ |
| | | ३१० | ७.१९६० | ३१२ | ३६० | ३०९ | ३११, ३१२ |
| | | ३११ | ३.६६५० | ३१२ | ३६० | ३१० | १७२ |
| | | ३५३ अ | ६१६.१५०० | खाडी | १७२, ३०३ ते ३१० ३१२ | खाडी व ३५५ | मुंबई हद्द |
| ६ | तारोडी | ३७ | ५७.१६०० | मौजे मोर्वा ची शिव | १० ते २१, ३२, ३३, ३४, | ३५३ | ३०४ |
| ७ | चौक | ७/१३अ/४५ | ०.०१०० | खाडी | २१ | खाडी | १ |
| ८ | मुर्धे | ४० | १९.५४०० | खाडी भाईंदरची शिव | ३५, ३७, ३८, ३९, ४५, ४१, ४४ | खाडी | ४२ |
| | | ४३ | ०.०३०० | भाईंदर | ४२ | खाडी | खाडी |
| ९ | राई | ६१ | ४.१३९० | ६२ | मोर्वा | ६० | ६६, ६४, ६५ |
| | | ६३ | १९.०३०० | राई | ६४ | ६२, ६५ | खाडी |
| | | १११ | ९३.८३२६ | भाईंदरची शिव | डोंगरीची शिव | खाडी | ११०, ११२, १२८, ९७, ९८, १२४, ११७, १२६, १२७, ११४, १२२, १२३, ९९, १०२ |
| | | १२३ | १.४२०० | खाडी | ११५ | १२२, ११४ | खाडी |
| | | १२८ | ०.०५०० | १११ | १११ | १११ | १११, १२७ |
| १० | भाईंदर | ३४२/१ | १०३.८३२० | ३३९, ३४०, ३४३, ३६७ | खाडी | खाडी | ३३७, ३७८, ३२८, ३६८ |
| ११ | मोरवा | ४८ | ०.७००० | ३२, ३३, ३६, ३७, ४१, ४२, ४३, ४५ | ५५ | २३ | डोंगरी |
| | | ५३ | ९.७८०० | ५५, ५४ | खाडी ५१, ५२ | ५६, ५८, ५९ | ५२, ५१ |
| | | एकूण | १०३६.८८२१ | | | | |

वर नमुद अधिसुचनेतील जमिनीबाबत किंवा त्यावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कथित अधिकारांच्या बाबतीत चौकशी करण्याकरिता आणि त्या अधिकारांचे, स्वरुप व व्याप्ती निर्धारित करण्याकरिता महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाकडील दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे अधिसुचनेद्वारे उपविभागीय अधिकारी, ठाणे यांची वन जमाबंदी अधिकारी म्हणून नियुक्ती करणेत आली आहे.

वन जमाबंदी अधिकारी ठाणे तथा उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ११, १२, १५ व १६ अन्वये पारित केलेल्या कोणत्याही आदेशावर करणेत आलेल्या अपिलावर

सुनावणी करणेकरीता भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम १७ अन्वये मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांची दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजीचे अधिसुचनेद्वारे नियुक्ती करणेत आलेली आहे.

सबब, भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये अधिसुचित क्षेत्राबाबतची उद्घोषणा भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ६ अन्वये करणेत येत आहे. प्रस्तुतचे उद्घोषणा प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १५ जानेवारी, २०२३ पर्यंत भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये अधिसुचित झालेल्या क्षेत्राबाबत **कोणताही हक्काचा दावा असलेस त्यांनी लेखी अर्जाद्वारे अथवा लेखी निवेदनाद्वारे समक्ष उपस्थित राहून वनजमाबंदी अधिकारी ठाणे तथा उपविभागीय अधिकारी, ठाणे, २ रा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कोर्टनाका, ठाणे (प) यांचे कार्यालयात दाखल करावा. भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये अधिसुचित झालेल्या क्षेत्राबाबत कोणताही हक्काचा दावा दिनांक १५ जानेवारी २०२३ नंतर प्राप्त झालेस तो विचारात घेतला जाणार नाही.**

दिनांक : ११ ऑक्टोंबर, २०२२.
स्थळ : ठाणे.

(अविनाश शिंदे)
वन जमाबंदी अधिकारी,
तथा
उपविभागीय अधिकारी,
ठाणे उपविभाग, ठाणे.